## ▪ 'परांजपे'च्या प्रीमियम स्कीमचा शुभारंभ

**पुणे** : परांजपे स्कीम्स (कन्स्ट्रक्शन) लिमिटेडने हिंजवडी फेज-१ मधील १५० एकरच्या ब्लू रिज इंटिग्रेटेड टाऊनशिपमध्ये 'द प्रोमेनेड रेसिडेन्सेस' या नवीन प्रीमियम निवासी प्रकल्पाच्या शुभारंभाची घोषणा केली आहे. आधुनिक वास्तुकला, प्रशस्त निवासस्थाने, मुळा नदीचे विहंगम दृश्य आणि एकाच संकुलात जागतिक दर्जाच्या सुविधा ही या प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. या प्रकल्पात निवासी संकुले, व्यावसायिक कार्यालये, आयसीएसई शाळा, अत्याधुनिक स्पोर्ट्स क्लब, हाय-स्ट्रीट रिटेल, कॅफे, रेस्टॉरंट्स आणि ९-होल गोल्फ कोर्स उपलब्ध आहेत. सुसंघटित आणि स्वयंपूर्ण जीवनशैलीची ही संकल्पना अधिक पुढे नेण्यासाठी 'द प्रोमेनेड रेसिडेन्सेस' विकसित करण्यात आले आहे, असे परांजपे स्कीम्स (कन्स्ट्रक्शन) लिमिटेडचे व्यवसाय विकास संचालक अमित परांजपे यांनी सांगितले.